महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा (गट-अ) मधील पशुधन विकास अधिकारी या पदावर सरळ सेवा भरती.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र.पसंप्र-२०१५/प्र.क्र.११२/पदुम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - ०४ जानेवारी,२०१६

वाचा : १. महाराष्ट्र लोकसेवा आयोग पत्र क्र. १९४ (१)(२)(४७) /१७५९८/ पंधरा-अ, दि.२० मार्च, २०१५
२. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग एसआरव्ही-२०१५/प्र.क.१५६/कार्या.१२, दि.२८.४.२०१५
३. शासन निर्णय समक्रमांक दि.२७.८.२०१५, दि.२८.८.२०१५ ,दि.२९.८.२०१५ , दि. ०२.९.२०१५, दि. ०८.०९.२०१५ , १०.०९.२०१५, दि.११.०९.२०१५, दि.१५.०९.२०१५, दि.९.१०.२०१५,दि.२१.१०.२०१५ , दि.२८.१०.२०१५, दि २०नोव्हेंबर,२०१५, दि. ०२.१२.२०१५ व दि.११.१२.२०१५

शासन निर्णय

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा (जाहीरात क्र.३५/२०१४) अनुसार निवड करुन शिफारस केलेल्या एकूण २९६ उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, वर्तणूक व पूर्व चारित्र्य अहवाल प्राप्त झाला आहे, अशा ०२ उमेदवारांची पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा (गट-अ) (वेतनश्रेणी १५,६००-३९,१०० ग्रेड पे -५४००) या पदावर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम (४३) मध्ये विहित केलेल्या परिविक्षाधिन या संज्ञेच्या व्याखेनुसार तात्पुरती नियुक्ती करण्यांत येत आहे. सदर नियुक्ती देण्यांत आलेल्या उमेदवारांचा परिविक्षा कालावधी २ वर्षाचा राहील. सदर उमेदवारांची पहिली वेतनवाढ त्यांचा १ वर्षाचा परिविक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतर व त्यानंतरची वेतनवाढ त्यांनी परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल.

नियुक्ती करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांची नावे व पदस्थापनेचा तपशिल

अ.क्र.	म.लो.आ. गुणवत्ता यादी क्र.	उमेदवाराचे नाव	सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२८.४.२०१५ नुसार वाटप करण्यात आलेल्या विभागाचे नांव	पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३	४	५
१.	२५	डॉ.पडोल अमोल रामदास	नागपूर	पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना,श्रेणी-१, कु-हाडी, ता.जि.गडचिरोली.
२.	१३६	डॉ.काळे स्वरुप शशिकांत	अमरावती	पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना,श्रेणी-१, पळशी, ता.खामगांव,जि.बुलढाणा

वरील उमेदवारांची पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट-अ मधील नियुक्ती ही २ वर्षाचा परिविक्षाधीन काळ समाधानकारकरीत्या पूर्ण करण्याच्या व खालील विहीत अटी व शर्तीच्या अधीन असेल.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांच्या अधीनतेने त्यांची ज्येष्ठता राहील.
२. या शासन निर्णयानुसार जरी उपरोक्त ०२ उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित होत असले तरी वाचा १ येथे अंकीत महाराष्ट्र लोकसेवा आयोग पत्र क्र. १९४ (१)(२)(४७) /१७५९८/ पंधरा-अ, दि.२० मार्च, २०१५ यांच्या पत्रामध्ये सुचिबध्द केलेल्या गुणानुक्रमानुसार अधिकाऱ्यांची सेवा जेष्ठता ठेवण्यात येईल.

३. वरील सर्व उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या पदावर नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या आत रुजू व्हावयाचे आहे. काही अपरिहार्य कारणास्तव त्यांना रुजू होण्यास मुदतवाढ हवी असल्यास तशी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. अन्यथा, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणानुक्रमानुसार त्यांना ज्येष्ठता मिळणार नाही व ते हजर होतील त्या दिनांकापासून त्यांची ज्येष्ठता धरण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी विहीत कालावधीत हजर न झालेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येईल.

४. वरील यादीतील काही उमेदवारांच्या मागील ०५ वर्षातील वास्तव्य कालावधी संदर्भातील चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-०७ यांचे मार्फत करण्याच्या अटींच्या अधिन राहून त्यांना तात्पुरती पदस्थापना देण्यात येत आहे. अशा उमेदवारांचे संबंधित पोलीस यंत्रणेकडून चारित्र्य पडताळणीबाबतचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर ज्या उमेदवारांबाबतचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी अहवाल असमाधानकारक असतील त्या उमेदवारांच्या नेमणुका ०१ महिन्याची नोटीस देऊन संपुष्टात आणण्यात येतील.

५. वरीलप्रमाणे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांनी सेवा प्रवेश नियमानुसार विभागामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या विभागीय परीक्षा, प्रादेशिक भाषा परीक्षा, संगणक परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी विभागीय लेखा परीक्षा तसेच विभागाअंतर्गत वेळोवेळी विहीत नियमानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या इतर परीक्षा परिविक्षा कालावधीच्या ०२ वर्षाच्या विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. परिविक्षाधीन अधिकाऱ्यांने कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहीत विभागीय लेखा परीक्षा परिविक्षा कालावधीत उत्तीर्ण न केल्यास अथवा त्याची वर्तणुक अयोग्य, संशयास्पद आढळल्यास तो /ती कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्यास पात्र ठरेल.

७. उपरोक्त पैकी जे उमेदवार त्यांच्या सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असतील त्यांनी शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एन आर व्ही १०७७/१२ दि.२०.५.१९७७ मधील तरतूदीनुसार शासनाला किमान ०१ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस देणे आवश्यक राहील. शासनास या उमेदवारांची सेवा समाप्त करावयाची असेल त्यावेळी अशी एक महिन्याची आगाऊ नोटीस दिली जाईल. मात्र गैरशिस्त, सेवानियमाचा भंग इ. कारणासाठी सेवा समाप्त करतांना वरील उमेदवारांना नोटीस देण्याचे शासनास बंधन राहणार नाही. हे नोटीशीचे नियम या नंतर वेळोवेळी होणाऱ्या नियमांतील बदलाच्या अधिन राहतील.

८. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ मधील तरतूदीनुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्या अधिकारी/कर्मचारी यांची शासकीय सेवेत नियुक्ती होते त्यांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरणार नाही. मात्र उपरोक्त उमेदवारांपैकी जे शासकीय कर्मचारी ०१ नोव्हेंबर २००५ पुर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असतील त्यांना शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२.१.२००७ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहतील.

९. पशुधन विकास अधिकारी, गट-अ या संवर्गात शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार शासन सेवेत आहेत अशा उमेदवारांचे गोपनीय अभिलेख नियुक्ती पूर्वी तपासण्याबाबत आयोगाने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने शासन सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे गोपनिय अहवाल १ महिन्याच्या आत आयुक्त, पशुसंवर्धन यांचेकडे जमा करावे. सदर गोपनीय अहवालाच्या तपासनीच्या अधिन राहून सदर उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत आहे.

१०. वरील सर्व उमेदवारांच्या खालील मूळ प्रमाणपत्रांची तपासणी आयुक्त पशुसंवर्धन, म.रा.पुणे यांनी तपासणी करावी व सदर कागदपत्रे संपूर्णपणे समाधानकारक असल्याची खातरजमा झाल्यानंतरच संबंधित उमेदवारांना हजर करुन घेण्याबाबतचे निर्देश संबंधित कार्यालय प्रमुखांना देण्यात यावेत व त्यानंतरच संबंधित कार्यालय प्रमुखांनी उमेदवारांना रुजू करुन घ्यावे. त्यासाठी संबंधित सर्व उमेदवारांनी त्यांच्याकडील मूळ प्रमाणपत्रासह आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-७ या कार्यालयाशी संपर्क साधावा.

१. जात वैधता प्रमाणपत्र.
२. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास)
३. वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र.
४. शाळा सोडल्याचा दाखला.
५. एस.एस.सी.प्रमाणपत्र.
६. एच.एच.सी.प्रमाणपत्र.
७. बी.व्ही.एससी प्रमाणपत्र/एमव्हीएससी प्रमाणपत्र.

११. ज्या उमेदवारांना रंगदृष्टीदोष (Colour Blindness) आढळून आला असेल अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांचे रंगदृष्टीदोषाबाबत पुन्हा तपासणी करुन घेऊन हे उमेदवार पशुधन विकास अधिकारी, गट-अ या पदावर काम करण्यास वैद्यकीयदृष्टया पात्र होतो किंवा कसे याची खात्री करण्यात यावी. तसेच त्यांना अंतिम वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्या शिवाय नियुक्ती देण्यात येऊ नये. हे निर्देश यापूर्वी दि.२७.८.२०१५, २८.८.२०१५ व २९.८.२०१५ रोजी पदस्थापना दिलेल्या उमेदवारांच्या बाबतीत देखील लागू राहतील.

१२. वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इतर मागासवर्ग तसेच अमागास (महिला) या वर्गवारीवर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे प्रमाणित केलेली उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची विहित नमुन्यातील दिनांक १ एप्रिल, २०१२ किंवा तद्नंतरच्या दिनांकाचे प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा.पुणे यांचेकडे तपासणीसाठी सादर करावी. सदरची प्रमाणपत्रे विहीत प्राधिकरणाकडून तपासण्याची कार्यवाही आयुक्त, पशुसंवर्धन, म.रा.पुणे यांनी करावी व तपासणीचा अहवाल शासनास सादर करावा.

१३. ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे व ज्यांनी नियुक्ती पूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुर्ती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक आहे. सर्व संबंधित उमेदवारांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणीसाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, संबंधित जात पडताळणी समितीने त्यांचे पडताळणी प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास संबंधित उमेदवारास दिलेले नियुक्तीचे आदेश त्वरीत रद्द करावेत आणि त्या उमेदवारा विरुध्द नियुक्ती प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागस वर्ग व विशेष मागस प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतूदीनुसार त्वरीत कारवाई करावी. या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याची जबाबदारी आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांची राहील. सर्व संबंधित उमेदवारांनी नियुक्तीच्या पदावर रुजू होताच जात वैधता तपासणीचा प्रस्ताव जातपडताळणी समितीकडे सादर करणे बंधनकारक राहील.

२. वरीलपैकी जे उमेदवार सेवेत हजर होतील त्यांचे बाबतचा अहवाल आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-७ यांनी शासनास तात्काळ सादर करावा.

३. वरील उमेदवार ज्या दिवशी हजर होतील त्या दिनांकापासून नियमाप्रमाणे त्यांचे गोपनीय अहवाल लिहीण्यात येतील व बदली झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावेत.

४. वरील नियुक्त्या ह्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेल्या जाहीरात क्र.३५/२०१४ बाबत विविध न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांच्या अधीन राहून करण्यात येत आहेत. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उमेदवारांची नियुक्ती सुरु ठेवणे अथवा गुणवत्ता क्रमांकामध्ये बदल होण्याच्या अधीन सदर नियुक्त्या करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१६०१०४१७४०२५४३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Shashank Madhav Sathe

Digitally signed by Shashank Madhav Sathe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb759493176e40002b178, cn=Shashank Madhav Sathe
Date: 2016.01.04 17:42:54 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
४) मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्रासह)
५) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे. (०५ प्रतीसह)
६) कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
७) सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) पुणे.
८) सर्व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त.
९) सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, औध,पुणे.
१०) सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, पुणे.
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळ, अकोला.
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
१३) सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
१४) सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,
१५) सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालये
१६) सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका पशुवैद्यकीय लघु सर्वचिकीत्सालये
१७) सर्व पशुधन विकास अधिकारी,जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र
१८) महालेखापाल/महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा)मुंबई/ नागपूर
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०) उपरोक्त १ ते ७ वरील उमेदवारांना आयुक्त पशुसंवर्धन,म.रा.पुणे यांचे मार्फत.
२१) निवड नस्ती (पदुम-१).